आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 29/09/2026 METRO CITY VRUTANT

> संपादक : रफी हुसेन > पिंपरी चिंचवड व पुणे > पान 4 > अंक 208 > RNI - MAHMAR /2021/51259 > metrocity924@gmail.com

# चाकण-हिंजवडीतील वाहतूक सुविधांसाठी विकास आराखड्यास मंजुरी – मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : चाकणमधील रस्ते, पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्थापन, पावसाळी पाणी निचरा व्यवस्थापन आदींच्या सुधारणेसाठी 1 हजार 400 कोटी रुपयांच्या आराखड्यास तसेच हिंजवडीतील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी प्रस्तावित 426 कोटी रुपयांच्या आराखड्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्वतः मंजुरी दिली.**



सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीत या आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे सचिव उपस्थित होते. पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आराखड्याचे सादरीकरण केले.

चाकण आणि हिंजवडीतील प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी डिसेंबरपासून कामे सुरु करण्याचे नियोजन करण्यात आले असून पुढील पावसाळ्यापूर्वी चाकणमधील वाहतूक आणि पाणी निचऱ्याच्या समस्यांमध्ये लक्षणीय सुधारणा करण्यात येणार असल्याचे डुडी यांनी यावेळी सांगितले.

चाकणमधील पायाभूत सुविधा विकासासाठी एमआयडीसी, पीएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद आणि अन्य संबंधित यंत्रणांना एकत्रितपणे काम करावे. रस्ते, पावसाळी निचरा, वाहतूक व्यवस्थापन आणि सार्वजनिक सुविधांच्या कामांसाठी विविध विभागांच्या निधीचा आणि यंत्रणांचा समन्वय साधावा असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

चाकण औद्योगिक परिसरात पावसाळ्यात पाणी साचण्याची समस्या गंभीर बनली आहे. परिसरातील सुमारे 78 किलोमीटर लांबीच्या नैसर्गिक नाल्यांवर अतिक्रमणे झाल्यामुळे पाण्याचा प्रवाह अडत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे औद्योगिक कंपन्यांमध्ये पाणी शिरणे, वाहतूक विस्कळित होणे आणि काही वेळा कंपन्यांचे कामकाज बंद ठेवण्याची वेळ येत आहे.या समस्येवर उपाय म्हणून नैसर्गिक नाले मोकळे करणे, रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना पावसाच्या पाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था उभारणे, कल्व्हर्ट आणि पुलांची क्षमता वाढविणे तसेच आवश्यक ठिकाणी पाणी साठविण्याची व्यवस्था उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सिंचन विभागाने केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे नाल्यांचे मार्ग निश्चित करण्यात आले आहेत.

नाल्यांवरील अतिक्रमणे हटविण्याची सुमारे 70 ते 80 टक्के कार्यवाही पूर्ण झाली आहे. उर्वरित अडथळे टप्प्याटप्प्याने दूर करण्यात येणार आहेत. काही ठिकाणी संबंधित बांधकामे हटविणे, तर काही ठिकाणी नैसर्गिक नाल्यांसाठी जागा उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे.

जून 2027 पर्यंत नैसर्गिक नाले मोकळे करून पाणी निचऱ्याची व्यवस्था पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासोबतच सुमारे 38 किलोमीटर लांबीची रस्त्यालगतची पावसाळी गटार व्यवस्था उभारण्याचे नियोजन असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा काँग्रेसची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित करत पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. निवडणूक आयोगाच्या कारभारात पारदर्शकता आणि निष्पक्षता राखली जावी, तसेच ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.**



निवडणूक आयोगातील दोन निवडणूक आयुक्तांनी मागील दहा महिन्यांत विविध निर्णयांबाबत किमान 14 वेळा लेखी आक्षेप नोंदवल्याचा वृत्तांत समोर आल्यानंतर या मुद्द्यावरून राजकीय वातावरण तापले आहे. या आक्षेपांमध्ये मतदार नोंदणी, मतदारांची नावे वगळणे, निवडणूक यादीतील बदल आणि S I R प्रक्रियेशी संबंधित बाबींचा समावेश असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे.

या पार्श्वभूमीवर काँग्रेसने निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर प्रश्न उपस्थित करत आंदोलन केले. आयोगाने मात्र विविध आयुक्तांची मते किंवा निरीक्षणे ही अंतर्गत विचारविनिमयाचा भाग असल्याचे सांगत, आयोगाचे अंतिम निर्णय सर्वानुमते घेतले जात असल्याचे स्पष्ट केले आहे.दरम्यान, पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने उपजिल्हाधिकारी श्रीमती ज्योती कदम यांना निवेदन देण्यात आले. निवडणूक आयोगाने सत्ताधाऱ्यांच्या दबावापासून मुक्त राहून निष्पक्षपणे काम करावे, अशी मागणी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केली.

आंदोलनात काँग्रेस शहर अध्यक्ष प्रशांत जगताप , ज्येष्ठ नेते मोहन जोशी, नगरसेवक अरविंद शिंदे, ज्येष्ठ नेते गोपाळ तिवारी, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष शिवा मंत्री, नगरसेविका आसिया मणियार, नगरसेविका सुमय्या नदाफ, महिला काँग्रेसच्या शहराध्यक्ष स्वाती शिंदे, युवक काँग्रेस अध्यक्ष सौरभ अमराळे, अक्षय जैन यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

काँग्रेस कार्यकर्त्यांनी निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात घोषणाबाजी करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

# महानगरपालिकेच्या वतीने थेरगाव येथे सफाई मित्र सुरक्षा शिबिर संपन्न

## 1,500 हून अधिक सफाई सेवकांचा सहभाग

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : शहराच्या स्वच्छतेची जबाबदारी पार पाडणाऱ्या सफाई सेवकांच्या आरोग्याची नियमित तपासणी तसेच सुरक्षित कामकाजाबाबत जनजागृती करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा 2026' अंतर्गत 'सफाई मित्र सुरक्षा शिबिरा'चे आयोजन करण्यात आले.**



थेरगाव येथील कै. शंकरराव गावडे कामगार भवन येथे झालेल्या या शिबिरात 'अ', 'ब', 'ड' 'ग' आणि 'ज' या पाच क्षेत्रीय कार्यालयांतर्गत कार्यरत 1,500 हून अधिक सफाई सेवकांनी सहभाग घेतला होता,या शिबिराचे उद्घाटन ग क्षेत्रीय अधिकारी मुकेश कोळप यांनी केले.

यावेळी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, सुधीर वाघमारे, अंकुश झिटे, अतुल सोनवणे, राजू साबळे, शांताराम माने, डॉ. संजय सोनेकर, डॉ. शंकर मोसलगी, आदी उपस्थित होते.

शिबिरात सफाई सेवकांची हिमोग्लोबिन, रक्तदाब, उच्च रक्तदाब आणि मधुमेहाची मोफत तपासणी करण्यात आली. दैनंदिन कामाच्या धावपळीत आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये, यासाठी संतुलित आहार, व्यायाम, योगासने, प्राणायाम, ताणतणावाचे व्यवस्थापन आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कामाच्या स्वरूपानुसार सुरक्षिततेच्या उपाययोजना आणि आरोग्यविषयक सवयींबाबतही माहिती देण्यात आली.

उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले, सफाई सेवकांचे काम शारीरिकदृष्ट्या आव्हानात्मक असल्याने संतुलित आहार, नियमित व्यायाम, योगासने आणि आरोग्य तपासणी आवश्यक आहे. आरोग्यविषयक समस्या वेळीच लक्षात आल्यास त्यावर योग्य उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाय करता येतात.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे म्हणाले, नियमित आरोग्य तपासणीमुळे प्राथमिक अवस्थेतील आरोग्यविषयक समस्या वेळीच निदर्शनास येतात. त्यामुळे सफाई सेवकांनी आरोग्य तपासणीसोबतच आहार आणि ताणतणावाच्या व्यवस्थापनाकडेही लक्ष द्यावे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये निर्बंध लागू!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया शांततेत, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) 2023 मधील कलम 163 अन्वये 31 ऑक्टोबर 2026 पर्यंत विविध निर्बंध लागू करण्यात असल्याचे पिंपरी-चिंचवडचे पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांनी आदेश जारी केले आहेत.**



पुणे विभाग शिक्षक व पदवीधर मतदारसंघासाठी 23 ऑक्टोबर 2026 रोजी मतदान होणार आहे. त्यानुसार निवडणूक कालावधीत शासकीय, निमशासकीय किंवा सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्वरूपात विद्रुपता करण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत.

निवडणूक कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये, तहसील कार्यालये, शासकीय कार्यालये व विधानसभा मतदारसंघ कार्यालयाच्या परिसरात कोणत्याही प्रकारची मिरवणूक, मोर्चा काढणे, सभा घेणे किंवा उपोषण करणे तसेच घोषणाबाजी, वाद्य वाजविणे व गाणी म्हणणे यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

तसेच निवडणूक कालावधीत प्रचारादरम्यान कोणत्याही वाहनाच्या छतामध्ये निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त मोटारगाड्या अथवा वाहने वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. सुरक्षेच्या कारणास्तव केंद्र किंवा राज्य शासनाचे मंत्री अथवा उच्चपदस्थ व्यक्तींच्या ताफ्यासंदर्भातील लागू आदेश मात्र कायम राहतील. शासकीय कामासाठी असलेल्या वाहनांना या निर्बंधातून वगळण्यात आले आहे.

निवडणूक कालावधीत कोणत्याही व्यक्ती, संस्था किंवा पक्षाच्या कार्यकर्त्यांना पोलीस अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही. फिरत्या वाहनावरून ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यासही मनाई करण्यात आली आहे. सकाळी 6 वाजण्यापूर्वी आणि रात्री 10 वाजल्यानंतर कोणत्याही प्रकारे ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही.

# चिखलीत घराबाहेर बोलण्यावरून वाद; तरुणावर चाकूने हल्ला



>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**चिखली : घरासमोर राहण्याच्या कारणावरून बोलण्याचा राग मनात धरून एका तरुणाने फिर्यादीला शिवीगाळ करत चाकूने पोटात वार करून गंभीर जखमी केल्याची घटना दत्तनगर, चिखली परिसरात घडली. याप्रकरणी पिंपरी पोलिसांनी एका आरोपीला अटक केली आहे. या प्रकरणी अंकुश पोपट नलावडे, वय 35 वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर, रा. दत्तनगर, मकडमळा, चिंचवड, पुणे यांनी फिर्याद दिली आहे.**

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, अविनाश पोपट नलावडे, रा. दत्तनगर, मकडमळा, चिंचवड हा आरोपी आहे. घटनेच्या वेळी फिर्यादी आणि साक्षीदार पूजा नलावडे हे आरोपीसमोर असताना आरोपीच्या मुलांबाबत बोलण्यात आले. त्यांची मुले झोपडपट्टीत राहत असून बिघडत असल्याने त्यांना बाहेर राहण्यास सांगितल्याचा राग आरोपीला आला.

याच कारणावरून आरोपीने फिर्यादी आणि साक्षीदाराला शिवीगाळ केली. त्यानंतर फिर्यादी घरासमोरील रस्त्यावर उभा असताना आरोपीने घरातील किचनमधून चाकू आणून फिर्यादीच्या पोटात चाकू खुपसला. या हल्ल्यात फिर्यादी गंभीर जखमी झाला.

घटनेनंतर पोलिसांनी आरोपीला अटक केली असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम 118(2), 352 तसेच भादंवि कलम 326 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भरधाव दुचाकीने धडक देत एकाचा मृत्यू




>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**बावधन : भरधाव वेगाने आणि वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून दुचाकी चालविताना पुढे असलेल्या वाहनाला धडक दिल्याने दुचाकीवरील एकाचा मृत्यू झाल्याची घटना बावधन परिसरात घडली. या प्रकरणी सागर शंकर पावडे, पोलीस शिपाई, नेमणूक बावधन पोलीस ठाणे यांनी फिर्याद दिली आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आदित्यनाथ चौगुले, (वय 18 वर्षे, रा. कोंढवा, पुणे) हा रॉयल एनफिल्ड जीटी कॉन्टिनेंटल 650 या दुचाकीचा चालक होता. 25 सप्टेंबर रोजी पहाटे साडेतीनच्या सुमारास मुंबईकडून साताऱ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर टाटा शोरूमच्या पुढे, चांदणी चौक, बावधन येथे आरोपी दुचाकी भरधाव वेगाने चालवत होता. वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून बेदरकारपणे वाहन चालविताना त्याने पुढे असलेल्या वाहनाला धडक दिली.

या अपघातात दुचाकीवर मागे बसलेले यशराज विजय मोरे जखमी झाले. त्यांना गंभीर दुखापत झाली आणि उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम 281, 106(1), 125(ब), 324(4) तसेच मोटार वाहन कायद्यातील संबंधित कलमांनुसार आणि भादंवि कलम 279 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
मंगळवार दिनांक 29/09/2026
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचा शनिवारी भव्य नागरी सत्कार सोहळा

## सुनेत्रा पवार, पार्थ पवार यांच्यासह अनेक मंत्री, आमदार उपस्थित राहणार

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 8 जुलै 1945 रोजी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या शासकीय नियामक मंडळावर महाराष्ट्र राज्य विधान सभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांची नियुक्ती झाली आहे. त्यानिमित्त शनिवारी (दि. 3 ऑक्टोबर) सकाळी 11 वाजता अण्णासाहेब बनसोडे यांचा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते भव्य नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.**



या सत्कार सोहळ्याचे अध्यक्षस्थान पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे हे भूषवणार आहेत. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार, सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र राज्य संजय शिरसाट, पालकमंत्री भरतशेठ गोगावले, खासदार पार्थ पवार, खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश दादा लांडगे, शंकर जगताप, गोपीचंद पडळकर, उमाताई खापरे, शंकर मांडेकर, बापू पठारे, सुनील कांबळे, सुनील शेळके, माजी आमदार विलास लांडे, सुनील टिंगरे आदी उपस्थित राहणार आहेत.

हॉटेल राగా पॅलेस, काळेवाडी विजयनगर पिंपरी (मदर टेरेसा उड्डाणपूल लगत) येथे सकाळी 11 वाजता, हा भव्य नागरी सत्कार सोहळा होणार आहे.

याचे आयोजक महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष माननीय अण्णासाहेब बनसोडे गौरव समिती पिंपरी चिंचवड शहर आणि सहआयोजक नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे युवा मंच पिंपरी चिंचवड शहर यांच्या वतीने समितीचे पदाधिकारी सुरेश निकाळजे, अंजना गायकवाड, गोपाळ मोरे, निलेश निकाळजे, प्रमोद क्षीरसागर, गंगाताई धेंडे, नितीन ओव्हाळ, संदीप पिसाळ, राहुल सोनवणे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

# प्रा.डॉ.मंगेश कराड 'मराठवाडा रत्न' पुरस्काराने सन्मानित

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल एमआयटी आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी (एमआयटी एडीटी) विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांना 'मराठवाडा रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मराठवाडा जनविकास परिषद, ठाणे यांच्या वतीने आयोजित मराठवाडा मुक्तिसंग्राम सोहळ्यात राम गणेश गडकरी रंगायतन, तलावपाळी येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.**




महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा झाला. मराठवाडा जनविकास परिषदेचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे आणि वरिष्ठ उपाध्यक्ष नितीन कदम यांनी प्रा. डॉ. कराड यांचा गौरव केला.

मराठवाडा जनविकास परिषद गेल्या 17 वर्षांपासून मराठवाड्यातील नागरिकांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे. संस्थेच्या वतीने दरवर्षी मराठवाडा बहुभाषिक दिन सोहळ्याचे आयोजन केले जाते. यंदा शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेत प्रा. डॉ. कराड यांची 'मराठवाडा रत्न' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

पुरस्काराबद्दल बोलताना प्रा. डॉ. मंगेश कराड यांनी सांगितले की, मराठवाडा ही केवळ भौगोलिक भूमी नसून त्याग, पराक्रम, अध्यात्म आणि संघर्षाचा ज्वलंत इतिहास असलेली भूमी आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि राजकीय जडणघडणीत मराठवाड्याचे योगदान अतुलनीय आहे. मराठवाड्याचा पुत्र म्हणून 'मराठवाडा रत्न' हा सन्मान मिळणे ही अभिमानाची बाब आहे.

माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांचे आशीर्वाद आणि मार्गदर्शनाच्या बळावर एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या शैक्षणिक कार्याला मिळालेली ही पुरस्काररूपी पावती आहे, असेही त्यांनी म्हटले.

शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल मिळालेला हा पुरस्कार केवळ वैयक्तिक सन्मान नसून कराड कुटुंबीय तसेच एमआयटी एडीटी विद्यापीठातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव असल्याची भावना प्रा. डॉ. कराड यांनी यावेळी व्यक्त केली.